दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना वाहतुक भत्ता मंजुर करणे बाबत..

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/३८३/२०२५
अहिल्यानगर दिनांक १० /०९/२०२५

वाचा:- १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ/२०१३/प्र.क्र.५७/सेवा-५ दि.४/०६/२००१
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहभ/क्र१००३/प्र.क्र./सेवा-५ दि.०२/०८/२००४
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहभ/२००९/प्र.क्र.७८/सेवा-५ दि.०५/०४/२०१०
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहभ/२०१४/प्र.क्र.५/सेवा-५ दि.०३/०६/२०१४
५. वित्त विभाग, शा.निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ दिनांक १० ऑगष्ट २०१५
६. वित्त विभाग, शासन पूरकपत्र क्रमांक वाहभ/२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ दि.१८/४/२०१७
७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था-१/८४२/२०२५ दिनांक ०८/०८/२०२५
८. मा.जिल्हा शल्यचिकित्सक, जळगाव यांचेकडील शिफारस पत्र जा.क्र.सारुज/दिमज/२३७३०/२०२५ दिनांक २६/०८/२०२५
९. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडिल अधिकार प्रदान आदेश जा.क्र.साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६

उक्त संदर्भ क्र.९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी खालील नमुद कर्मचा-यास मा.जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिलेल्या अपंग प्रमाणपत्रानुसार संबंधित कर्मचारी ४०% पेक्षा अधिक शारिरीक दृष्टया अपंग असल्याचे प्रमाणित केलेले आहे. वैद्यकिय अधिका-याने दिलेल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचा-यास अपंगत्व असल्याचे प्रमाणित केले असल्यास त्या तारखेपासून किंवा त्याच्या शासकीय सेवेतील नेमणुकीच्या तारखेपासून यातील जी तारीख नंतर असेल तेव्हापासून उक्त संदर्भिय शासन परिपत्रक व शासन निर्णयातील अटी व शर्तीस अधिन राहून वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या संवर्गातील खालील नमूद दिव्यांग कर्मचा-यास वाहतुक भत्ता (विशेष वाहन भत्ता) मंजूर करीत आहे.

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव व हुददा | तालुका | सलग सेवा दिनांक | अपंगाचा प्रकार, अपंगाची टक्केवारी व अपंग प्रमाणपत्राचा दिनांक | अपंग वाहतुक भत्ता मंजुरीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.व्ही.डी.जाधव | संगमनेर | १६.०८.२०२४ | Multiple Disability 43% दिनांक ०३.०२.२०२३ | १६.०८.२०२४ |

**अटी व शर्ती :-**

१. कर्तव्यस्थानापासून एक कि.मी. अंतराच्या आत निवासस्थान असल्यास हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. (वाहन भत्याचे प्रदान संबंधित कर्मचा-यास त्याला पुरविण्यात आलेले शासकीय निवासस्थान कर्तव्यस्थानापासुन एक किलो मिटरच्या आत किंवा कर्तव्यस्थान यांच्या एकत्र परिसरात नाही असे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन राहून वाहन भत्ता मंजुर करता येईल).

२..

२. ज्या कर्मचा-यांना शासकीय वाहतुक सुविधा पुरविण्यात आलेली असेल त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. अस्थीव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचा-याला वरच्या अथवा खालच्या अवयवाची किमान ४० % कायमस्वरुपाची आंशिक विकलांगता असावी किंवा वरच्या व खालच्या अवयवाची मिळून किमान ६० % आंशिक विकलांगता असावी.

३. शासकीय कर्मचा-याची दोन्ही डोळयाची दृष्टी ३/६० पेक्षा कमी असावी अथवा क्षेत्रदृष्टी १० अंशापेक्षा कमी असावी, परंतु एका डोळयाने अंध असलेली शासकीय कर्मचारी या आदेशाच्या प्रयोजनार्थ अंध मानन्यात येऊ नये.

४. शासकीय कर्मचा-यास पाठीच्या कण्याच्या विकाराने ४०% पेक्षा अधिक कायमचे आंशिक अपंगत्व आलेले असावे.

५. वैद्यकिय अधिका-याने आपल्या शिफारस पत्रात ज्या तारखेपासून अशा कर्मचा-यास अपंगत्व आल्याचे प्रमाणीत केले असल्यास त्या तारखेपासून किंवा त्याच्या शासकीय सेवेतील नेमणुकीच्या तारखेपासून यातील जी तारीख नंतर असेल तेव्हा पासून संबंधित विभाग प्रमुखांनी वाहतुक भत्ता मंजुर करावा. अपंग वाहनभत्ता लाभ देण्याअगोदर संबंधित अपंग कर्मचा-याकडून १००/- रु चे बॉन्ड पेपरवर भविष्यात लेखा परिक्षणात वसुली निघाल्यास ती भरण्यास मी तयार असले बाबतचे हमीपत्र घेण्यात येऊन त्याबाबतची नोंद मूळ सेवापुस्तकात घेण्यात येऊन हमीपत्र सेवापुस्तकात डकवावे. सदर वाहतुक भत्ता हा रजा, प्रशिक्षण, दौरा इ.कारणामुळे ३० (तीस) दिवसापेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी अनुज्ञेय असणार नाही.

६. आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील अटींची पुर्तता झाल्यावरच संबंधितांना अपंग भत्ता अदा करावा.

७. सदर वाहतुक भत्याची रक्कम संबंधिताचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची पडतात त्याच लेखाशिर्षाखाली टाकून अदा करण्यात यावे.

सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मूळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०९१००५००५९ असा आहे.

Signed by
Shailesh Hindurao More
Date: 10-09-2025 12:06:27

(शैलेश मोरे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रतिः-श्री.व्ही.डी.जाधव,वरिष्ठ सहायक (लेखा),पंचायत समिती संगमनेर
द्वारा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

प्रतः- आस्थापना-२, अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रतः- गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर

प्रतः- निवडनस्ती